| एकूण... | ८५८ | ७४७ | २७२२ | ७४३ | ८०४२ | ३४६५ | ८५४ | २६२ | ३४०१ | १११६ | ३०० | २३ | २३८ | ३२३ | १३४ | १४ | १६१ | १४८ |
| सरासरी | | | ३·६ | १·० | १०·८ | ४·६ | १·१ | ०·४ | ४·६ | १·५ | ०·४ | ०·०३ | ०·३ | ०·४ | ०·२ | ०·०२ | ०·२ | ०·२ |

| गांव | कडधान्यें | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हरभरा | | | | तूर | | | | मटकी | | | | हुलगे | | | | मूग | | | |
| | घरीं ठेवलेलें मण | विकलेलें मण | विकलेलें रुपये | एकूण मण | घरीं ठेवलेलें मण | विकलेलें मण | विकलेलें रुपये | एकूण मण | घरीं ठेवलेलें मण | विकलेलें मण | विकलेलें रुपये | एकूण मण | घरीं ठेवलेलें मण | विकलेलें मण | विकलेलें रुपये | एकूण मण | घरीं ठेवलेलें मण | विकलेलें मण | विकलेलें रुपये | एकूण मण |
| पाटाखालील | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| कुसूर | १८ | ... | ... | १८ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| कांचलेश्वर | २२ | ४ | ४१ | २६ | ११ | ३ | ४६ | १४ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| मुंजवडी | १८ | ४ | ८८ | २२ | १ | ... | ... | १ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| एकूण... | ५८ | ८ | १२९ | ६६ | १२ | ३ | ४६ | १५ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| सरासरी | ०·१ | ०·०२ | ०·४ | ०·२ | ०·०४ | ०·०१ | ०·१ | ०·०५ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| इतर | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| विवी | १९ | ... | ... | १९ | १० | ... | ... | १० | ४३ | ... | ... | ४३ | ११ | ... | ... | ११ | २ | ... | ... | २ |
| दुधेबावी | ... | ... | ... | ... | २० | ... | ... | २० | १५ | ... | ... | १५ | ३ | ... | ... | ३ | ... | ... | ... | ... |
| निर्गुडी | १२ | ... | ... | १२ | ९ | ... | ... | ९ | ३ | ... | ... | ३ | १ | ... | ... | १ | ... | ... | ... | ... |
| एकूण... | ३१ | ... | ... | ३१ | ३९ | ... | ... | ३९ | ६१ | ... | ... | ६१ | १५ | ... | ... | १५ | २ | ... | ... | २ |
| सरासरी | ०·०७ | ... | ... | ०·०७ | ०·०९ | ... | ... | ०·०९ | ०·१ | ... | ... | ०·१ | ०·०३ | ... | ... | ०·०३ | ... | ... | ... | ... |
| एकूण सहा गांवें | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण... | ८९ | ८ | १२९ | ९७ | ५१ | ३ | ४६ | ५४ | ६१ | ... | ... | ६१ | १५ | ... | ... | १५ | २ | ... | ... | २ |
| सरासरी | ०·१ | ०·०१ | ०·२ | ०·१ | ०·०७ | ... | ०·०६ | ०·०७ | ०·०८ | ... | ... | ०·०८ | ०·०२ | ... | ... | ०·०२ | ... | ... | ... | ... |

| गांव | गळिताचीं धान्यें | | | | | | | | वैरण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भुइमूग | | | | करडी | | | | कडबा | | | | सरमाड | | | |
| | घरीं ठेवलेलें मण | विकलेलें मण | विकलेलें रुपये | एकूण मण | घरीं ठेवलेलें | विकलेलें मण | विकलेलें रुपये | एकूण मण | घरीं ठेवलेल्या पेंढ्या | विकलेल्या पेंढ्या | विकलेल्या रुपये | एकूण पेंढ्या | घरीं ठेवलेल्या पेंढ्या | विकलेल्या पेंढ्या | विकलेल्या रुपये | एकूण पेंढ्या |
| पाटाखालील | | | | | | | | | | | | | | | | |
| कुसूर | ३ | ... | ... | ३ | १२ | १ | १० | १३ | ११,५६५ | २,५५० | १७४ | १४,११५ | १०,९५० | १५० | ३ | ११९०० |
| कांचलेश्वर | ... | ... | ... | ... | १ | ... | ... | १ | १२२२०० | ३,७०० | २३० | १२५९०० | ८,६०० | ... | ... | ८६०० |
| मुंजवडी | १७ | ... | ... | १७ | १० | २ | १९ | १२ | ५१,७७५ | १,८५० | १२२ | ५३,६२५ | ६,९०० | ... | ... | ६९०० |
| एकूण... | २० | ... | ... | २० | २३ | ३ | २९ | २६ | १८५५४० | ८,१०० | ५२६ | १९३६४० | २६,४५० | १५० | ३ | २६६०० |
| सरासरी | ०·०६ | ... | ... | ०·०६ | ०·०७ | ... | ०·०९ | ०·०८ | ६२६·८ | २७·३ | १·७ | ६५४·१ | ८९·३ | ०·५ | ०·०१ | ८९·८ |
| इतर | | | | | | | | | | | | | | | | |
| विवी | २८ | ... | ... | २८ | १३ | ६ | ७२ | १९ | ६१,८७० | १,७०० | ३५ | ६३,५७० | ७९,१६५ | १४२५ | १५ | ८०५९० |
| दुधेबावी | १५ | ... | ... | १५ | ३ | ... | ... | ३ | ७२,९४५ | ९,३१५ | २७२ | ८२,२६० | ६०,३६० | ४०० | ३ | ६०७६० |
| निर्गुडी | ४३ | ... | ... | ४३ | १ | ... | ... | १ | ६७,६२५ | २,००० | ५५४ | ६९,६२५ | ४९,७२५ | ... | ... | ४९७२५ |
| एकूण... | ८६ | ... | ... | ८६ | १७ | ६ | ७२ | २३ | २०२४४० | १,३०१५ | ८६१ | २१५४४५ | १८९२५० | १८२५ | १८ | १९१०७५ |
| सरासरी | ०·२ | ... | ... | ०·२ | ०·०४ | ०·०१ | ०·२ | ०·०५ | ४५०·० | २८·९ | १·९ | ४७८·९ | ४२०·७ | ४·० | ०·०४ | ४२४·७ |
| एकूण सहा गांवें | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण... | १०६ | ... | ... | १०६ | ४० | ९ | १०१ | ४९ | ३८७९८० | २१,११५ | १३८७ | ४०९०९५ | २१५७०० | १९७५ | २१ | २१७६७५ |
| सरासरी | ०·१ | ... | ... | ०·१ | ०·०५ | ०·०१ | ०·१ | ०·०७ | ५११·२ | २८·३ | १·८ | ५४७·५ | २८८·८ | २·६ | ०·०३ | २९१·४ |

कोष्टक नं. ४ मध्यें गांवांतील शेतकऱ्याजवळील वेगवेगळ्या जनावरांची संख्या दाखवली आहे.

बैलांमध्यें कामाचे व निकामी असें वर्गीकरण केल्यावर निकामी बैलांची संख्या फारच थोडी आलेली आढळते. ही संख्या पूर्णपणें निकामी बैलांची असून अगदीं थोडें काम देणारे बैलहि 'कामाचे' या सदराखालीं धरले गेले असावेत असें दिसतें. कामाच्या बैलांचा शेतकऱ्यांस पडणारा तुटवडा या कोष्टकावरून दिसून येतो. सर्व गांवें मिळून जनावरें असणाऱ्या प्रत्येक कुटुंबामागें ०.८ बैल सरासरी येतो. जनावरें असणाऱ्या कुटुंबांची संख्या (७२०) ही शेती करणाऱ्या कुटुंबांचे (७४७) संख्येपेक्षां थोडी कमीच आहे हें ध्यानांत घेतल्यास या तुटवड्याचें स्वरूप जास्त लक्षांत येईल. पाटाखालील, गांवांमध्यें बैलांचें प्रमाण जास्त आहे. तेथें सरासरी दर कुटुंबामागें १.१ बैल येतो. उलट कोरडवाहू गांवांत हें प्रमाण कमी म्हणजे ०.७ वर जातें.

गाईंची संख्या याहून बरीच कमी आहे. गाईंचें प्रमाण दर कुटुंबामागें सरासरी ०.४ पडत असून त्यांपैकीं निम्या गाई दुभत्या व निम्या भाकड अशी वांटणी आहे. पाटाखालील गांवांत बैलांप्रमाणेंच गाईंचें प्रमाणहि इतर गांवांपेक्षां बरेंच जास्त आढळतें याचें कारण स्पष्टच आहे.

दुधाचा धंदा या भागांत जवळजवळ नाहींच हें म्हशींच्या संख्येवरून दिसून येईल. सरासरी दर कुटुंबामागें म्हशींचें प्रमाण ०.०६ इतकें पडत असून त्यांपैकीं निम्या दुभत्या व निम्या भाकड अशी वांटणी आहे. म्हशींच्या बाबतींत पाटाखालील गांवांपेक्षां कोरड्या गांवांतच जास्त चांगली स्थिति आढळून येते ही आश्चर्याची गोष्ट वाटेल. परंतु सरासरी दर कुटुंबास येणाऱ्या एकूण वैरणीचें प्रमाण इतर गांवांत पाटाखालील गांवांपेक्षां जास्त आहे हें लक्षांत घेतल्यास (कोष्टक ६ पहा) याचें कारण लक्षांत येईल.

शेळ्यांचें प्रमाण दर कुटुंबामागें १.५ इतकें असून पाटाखालील गांवांत जास्त (२.३) व इतर गांवांत कमी (१.०८) असें आढळतें.

लोकरीचा धंदा संस्थानच्या कांहीं भागांत विशेष चालतो हें मेंढ्यांचे संख्येवरून दिसून येईल. विशेषतः कुसूर, व निर्गुडी या गांवांत हें प्रमाण साधारणपणें सरासरी दर कुटुंबामागें ५ चे आसपास येतें. हें प्रमाण याहून जास्त असावें असें वाटतें. कारण एकाच मेंढपाळाजवळ बऱ्याच मेंढ्या असल्यामुळें थोड्या मेंढपाळांची माहिती जरी पाहणींत येऊं शकली नाहीं तरी प्रमाण कमी पडतें. कुसूर, दुधेबावी व निर्गुडी या गांवांतील मेंढ्यांची संख्या ५०० हून जास्त आहे.

कोंबडीं पाळण्याचा धंदा सर्व संस्थानांत लहान प्रमाणांत पण बरेचसे शेतकरी करतात हें कोष्टकावरून दिसून येतें. सरासरी दर कुटुंबामागें कोंबडयांचें प्रमाण १·४ पडतें. पाटाखालील गांवांत हें प्रमाण २ असून इतर गांवांत १ आहे. कोणत्याहि एका गांवांत हें प्रमाण जास्त अगर कमी नसून सर्व पाटाखालील गांवांत साधारण सारखें व सर्व इतर गांवांत साधारण सारखें असें दिसतें.

कोष्टक नं. ५ मध्यें जनावरें असलेल्या कुटुंबांना जनावरांपासून मिळालेलें उत्पन्न दाखविलें आहे. त्यांत उत्पन्नाचा घरीं ठेवलेला भाग व विकलेला भाग आणि त्याची किंमत अशी वांटणी करून दाखविलेली आहे. आपल्या शेतींत शेतीबरोबरचे व्यवसाय (Mixed farming) फार कमी आहेत, हें या कोष्टकावरून दिसून येतें. सरासरीनें दर कुटुंबास जनावरांपासून वर्षास रु. ५·४ उत्पन्न मिळतें. पाटाखालील गांवांत हें प्रमाण रु. ६·९ इतकें असून इतर गांवांत रु. ४·४ आहे. यांतील सर्वांत मोठा वांटा अंडयाचे विक्रीचा असून नंतर लोंकर, म्हशीचें दूध, गाईचें दूध, खत, खवा व शेळीचें दूध असा क्रम आहे.

सरासरीनें दर कुटुंबास वर्षास १३२ अंडीं मिळत असून त्यांपैकीं जवळजवळ निम्मा भाग विक्रीस जातो. अंडयांच्या विक्रीचा व्यवहार चांगला बसला असून घेवारी गांवीं अगर बाजारचे गांवीं अंडीं विकत घेऊन फलटण, लोणंद, बारामती, नातेंपुतें येथें विक्रीस पाठवतात. अंडयांचा भाव रु. १३ इतका चांगला मिळतो.

लोंकर विक्रीचें उत्पन्न सरासरी दर कुटुंबास ०·७ रुपये इतकें पडतें. यांत फक्त विकलेली लोंकर धरलेली आहे. इतर गांवांत विशेषतः दुधेबावी येथें अनेक मेंढपाळांचे स्वतःचे माग आहेत. त्या लोंकरीचें उत्पन्न बरेंच असून तें येथें धरलें गेलेलें नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

गाईच्या दुधाचें उत्पन्न पाटाखालील गांवांत दर कुटुंबामागें ४८·५ शेर असून इतर गांवांत २३·९ शेर आहे. यांपैकीं फारच थोडा भाग विकला जात असून बहुतेक सर्व दूध घरींच खर्च होतें. म्हशीच्या दुधाचें उत्पन्न या मानानें फारच कमी (पाटाखालील गांवें—सरासरी ११·१ शेर; इतर गांवें—सरासरी १४·३ शेर) असूनसुद्धां त्यांतील विक्री गाईच्या दुधाच्या विक्रीपेक्षां दुपटीहून जास्त आढळते.

शेळ्या या बहुधा मुलांना दूध मिळावें यासाठींच पाळल्या जात असल्यानें त्यांच्या दुधाची विक्री फारशी आढळत नाहीं.

सरासरी प्रत्येक कुटुंबास पाटाखालील भागांत ४·३ गाडया व इतर भागांत २·३ गाडया खत निघतें. यांतहि विक्रीचें प्रमाण फारच थोडें आहे. शेणाच्या गोवऱ्या करून विकण्याचा प्रघातहि फारसा दिसत नाहीं.

दुधापासून लोणी, तूप, खवा वगैरे करण्याचा धंदा म्हशीचें दूधच फार थोडें असल्यानें जवळजवळ नाहींच. फक्त निर्गुडी या गांवांत खवा करण्याचा धंदा थोडा चालू आहे.

कोष्टक नं. ६ मध्यें पिकलेलीं वेगवेगळीं धान्यें व वैरण, त्यांची घरीं ठेवलेलें व विकलेलें अशी वांटणी व विकलेल्या भागाची किंमत ही माहिती दाखवली आहे. जनावरांपासून येणाऱ्या उत्पन्नाचे माहितीप्रमाणेंच या माहितीवरूनहि संस्थानांतील शेतीचा धंदा फक्त पोट भागवण्यापुरता कसा आहे हें दिसून येईल. सर्व धान्यें मिळून दर कुटुंबास सरासरी ७·१ मण धान्य होतें. यापैकीं फक्त १·५ मण धान्य विक्रीस जातें. बहुतेक सर्व (१ मण) विक्री ज्वारीची आहे. राहिलेल्यांतील मोठा भाग (०·४) बाजरी असून इतर धान्यांची विक्री अगदींच थोडी आहे. सरासरी प्रत्येक कुटुंबाचे घरीं ठेवलेलें एकूण धान्य अवघें ५·७ मण भरतें. यावरून शेतकरी शेतीचे धंद्यावर पोटसुद्धां भागवूं शकत नाहीं हें दिसून येतें. पाटाखालील गांवांची स्थितीसुद्धां या बाबतींत कोरडवाहू भागापेक्षां मोठीशी चांगली आहे असें नाहीं. बागायती पिकांचे बाबतींत, विशेषतः उंसाचे बाबतींत, पाटाखालील गांवांचें उत्पन्न जास्त असलें तरी या कोष्टकांत दाखवलेल्या पिकांचे बाबतींत पाटाखालील गांवांचें उत्पन्न इतर गांवांहून कमी दिसतें. पाटाखालील गांवांत एकूण होणाऱ्या धान्याचें प्रत्येक कुटुंबामागें सरासरी प्रमाण ६·५ मण पडतें तर कोरडवाहू गांवांत तें प्रमाण ७·६ पडतें.

वेगवेगळ्या पिकांचे बाबतींत, प्रत्येक कुटुंबाचें सरासरी उत्पन्न लक्षांत घेतल्यास, ज्वारी, बाजरी, खपला, साळ, हरभरा, भुइमूग, मटकी, तूर, करडी, हुलगे असा उत्पादित मालाचा क्रम लागतो. ज्वारीचें उत्पादन पाटाखालील व कोरडवाहू या दोनहि भागांत सारखेंच दिसतें. बाजरीचें उत्पादन मात्र कोरडवाहू भागांत पाटाखालील भागापेक्षां बरेंच जास्त दिसतें. खपला गहूं दोन्ही भागांत साधारण सारखाच होतांना दिसतो तर साळीचें व हरभऱ्याचें उत्पादन पाटाखालील भागांत बरेंच जास्त असलेलें आढळून येतें. मटकी, हुलगे, मूग वगैरे धान्यें थोड्याच प्रमाणांत व तींहि फक्त कोरडवाहू भागांत आढळून येतात. याचा अर्थ पाटाखालील गांवांत तीं मुळींच येत नसावींत असा नाहीं. हीं पिकें अगदींच थोडीं काढलीं जात असल्यामुळें व पाटाखालील गांवांत इतर, विशेषतः बागायती, उत्पादन बरेंच असल्यामुळें तीं नमूद केलीं गेलीं नसावींत. भुइमूग व करडी या गळिताच्या धान्यांचें उत्पादन फारच थोडें आढळतें. फलटण येथें तेलाचे घाणे असले तरी गळिताचीं धान्यें मात्र तेल्यांस बाहेरून कां आणावीं लागतात हें येथें लक्षांत येईल.

कडब्याचें सरासरी दर कुटुंबामागें प्रमाण ५४७·५ पेंढ्या असें बसत असून पाटाखालील गांवांत तें जास्त ६५४·१ व इतर गांवांत कमी ४७८·९ बसतें. विक्रीचें प्रमाण अगदींच थोडें असून दोन्ही प्रकारच्या गांवांत २ रुपयांचे आंत आहे. कोरडवाहू गांवांत बाजरीचें उत्पादन बरेंच जास्त असल्यानें सरमाडाचें प्रमाणहि त्या गांवांत पाटाखालील गांवांपेक्षां पुष्कळच जास्त आहे. सरमाडाची विक्री अगदींच थोडी आहे.

## कोष्टक नं. ७—बागाईत पिकांच्या विक्रीचें उत्पन्न

| गांवें | कुटुंबें | | ऊंस | कांदे | केळीं | मोसंबी | डाळिंबें | कलिंगडें | एकूण बागाईत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | शेतकरी | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| पाटाखालील | | | | | | | | | |
| कुसूर | ११४ | ९९ | ४६५० | १८८ | ... | ... | ... | ... | ४८३८ |
| कांबळेश्वर | ८९ | ८३ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... |
| भुंजवडी | १२५ | ११४ | ९००० | ... | ... | ३५० | .... | ... | ९३५० |
| एकूण... | ३२८ | २९६ | १३६५० | १८८ | ... | ३५० | ... | ... | १४१८८ |
| सरासरी | | | ४६·१ | ०·६ | ... | १·१ | ... | ... | ४७·९ |
| इतर | | | | | | | | | |
| विंधी | १६५ | १३४ | ... | ४ | ... | ... | ... | ... | ४ |
| दुधेबावी | २२५ | १९८ | ७५०० | ४ | ३८५ | ... | ५० | ३१ | ७९७० |
| निर्गुडी | १४० | ११९ | ... | ७०० | २५० | १००० | ... | ... | १९५० |
| एकूण... | ५३० | ४५१ | ७५०० | ७०८ | ६३५ | १००० | ५० | ३१ | ९९२४ |
| सरासरी | | | १६.६ | १·५ | १·४ | २·२ | ०·१ | ०·०६ | २२ |
| एकूण सहा गांवें | ८५८ | ७४७ | २११५० | ८९६ | ६३५ | १३५० | ५० | ३१ | २४११२ |
| सरासरी | | | २८·३ | १·१ | ०·८ | १·८ | ०·०६ | ०·०४ | ३२·४ |

कोष्टक नं. ७ मध्यें बागाइती पिकांच्या विक्रीचें उत्पन्न दाखविण्यांत आलेलें आहे. कोष्टकांत घेण्यांत आलेल्या पिकांचा बहुतेक सर्व भाग विक्रीकडेच जात असल्यामुळें या पिकांच्या विक्रीचें रोख उत्पन्न हेंच या कोष्टकांत दाखविण्यांत आलें आहे. शिवाय माहिती घेतांना असें आढळून आलें कीं या पिकांचें उत्पन्न नक्की किती झालें हें बऱ्याच शेतकऱ्यांस सांगतां येत नाहीं. कांहीं जणांनीं माल उक्ता विकलेला असतो. कांहीं जण उंसाच्या गाड्या विकतात; कांहीं गूळ करून विकतात; कांहीं दोन्ही करतात. यामुळें त्या पिकांचें उत्पन्न त्यांच्या विक्रीपासून आलेल्या रोख उत्पन्नावरून दाखविणेंच जास्त शक्य दिसलें.

पाटाखालील गांवांतील बागाइती पिकांत उंसाचें पीक अतिशय महत्त्वाचें असलेलें दिसून येतें. सरासरीनें दर कुटुंबामागें बागाइती पिकांचे विक्रीपासून रु. ४७.९ आलेले आहेत. त्यांपैकीं रु. ४६.१ इतके उंसापासून आलेले आहेत. पाटाखालील तीन गांवांपैकीं कांबळेश्वर या गांवांत उंसापासून मुळींच उत्पन्न आलेलें नाहीं असें कोष्टकावरून दिसतें. या गांवांत फक्त ५॥ एकर ऊंस व तोहि नवीनच लावलेला होता. इतर शेतकऱ्यांस ऊंस लावण्याची परवानगी मिळालेली नाहीं. इतर बागाइती पिकांचें प्रमाण या भागांत फारच कमी आहे.

कोरडवाहू गांवांपैकीं दुधेबावी या गांवांत केळीं, डाळिंबें, कलिंगडें वगैरे चांगली बागाईत असून ऊंसहि लावलेला आहे. निर्गुडीमध्येंहि कांदे, केळीं, मोसंबीं यांचें चांगलें उत्पन्न आढळतें. बिबी या गांवांत बागाईत फारच थोडी आहे. या गांवांमध्यें सरासरी बागाइती उत्पन्न रु. २२ पडत असून त्यांत उत्पन्न देणाऱ्या पिकांचा क्रम ऊंस, मोसंबीं, कांदे, केळीं, डाळिंबें व कलिंगडें असा आहे.

कोष्टक नं. ८ मध्यें शेतकऱ्यांनीं काढलेल्या कर्जासंबंधीं माहिती दिलेली आहे. सावकारासंबंधीं माहिती, त्याची जात व वास्तव्य अशा दोन तऱ्हांनीं दाखविली असून, कर्जाची रक्कम, व्याजाचा दर, तारण, कर्ज काढण्याचें कारण, काळ, यांच्या वेगवेगळ्या प्रकारांनीं किती व्यवहार झाले त्याची माहिती दिली आहे. त्यानंतर आजच्या एकूण देण्याचा आंकडा दिला असून पुढें कर्जाचा इतिहास नमूद केला आहे.

कर्ज काढणाऱ्या कुटुंबांचें प्रमाण सर्व कुटुंबांशीं शें. ४८ असें पडतें. पाटाखालील गांवांत हें प्रमाण शें. ४१ इतकें कमी असून कोरडवाहू गांवांत जास्त म्हणजे शें. ५० आहे. कर्ज काढणाऱ्या कुटुंबांची संख्या व एकंदर व्यवहारांची संख्या यांचें प्रमाण १ : १.५ असें पडतें. कर्ज घेणाऱ्यांमध्यें शेतकरी व इतर व्यवसायी असे भाग पाडले आहेत त्यांत अर्थातच शेतकऱ्यांची संख्या जास्त भरते. सावकारांमध्यें मराठा व धनगर जातींचें प्रामुख्य आढळतें हें खालीं शेतकरी-सावकारांच्या व्यवहारांची संख्या सर्वांत मोठी असलेली दिसते त्यास पूरक असें आहे. त्यांचेखालीं वाणी, जैन वगैरेंचा व नंतर इतर हिंदु, इतर अस्पृश्य, महार व ब्राह्मण असा क्रम लागतो.

सावकारांचे वास्तव्याचे बाबतींत गांवचा, संस्थानांतील इतर गांवचा, बाहेरील व शेवटीं फलटणचा, असा क्रम लागतो.

कर्जाच्या मुद्दलाचें वर्गीकरण पाहतां १०० ते १५० या वर्गांत सर्वांत जास्त (१८२) व्यवहार झालेले दिसतात. ४९ व आंत, ५० ते १०० व १५० ते २०० या प्रत्येक वर्गांत साधारण ९० चे आसपास इतके व्यवहार झालेले आहेत. शेतकऱ्यास लहान कर्जाची जरूरी किती भासते हें एकूण ६०४ व्यवहारांपैकीं ४६० व्यवहार २०० रु. चे आंतील मुद्दलाचे आहेत यावरून लक्षांत येईल.

व्याजाच्या दराचे वर्गीकरणांत रु. १६ ते २० या दरानें ⅓ हून जास्त व्यवहार झालेले दिसतात. एक रुपयास दर महिन्यास एक पैसा व्याज हा दर शेतकऱ्यांत फार प्रचलित आहे हें यावरून दिसून येईल. त्याहून खालीं क्रम रु. ११ ते १५ या दराचा लागतो. कोऑपरेटिव्ह सोसायट्यांचा व्याज वेळीं न देणाऱ्यांना १२॥ दर असल्यामुळें या दरांत बरेच व्यवहार आढळून येत असावेत. २१ ते २५ व २६ ते ३० यापेक्षां ३१ ते ४० या दरांत व्यवहार जास्त दिसतात याचें कारण एक रुपयास दर महिन्यास २ पैसे हा दरसुद्धां बरेच ठिकाणीं प्रचलित आहे हें असावें. एकंदर व्यवहारांत कबजे गहाणाच्या व्यवहारांचें प्रमाण ११ स १ पडतें. साधारण व्यवहार बिनव्याजी कर्जाचे आहेत.

कर्जास कोणतेंहि तारण नसल्याचे व्यवहार जवळजवळ निम्मे आहेत. त्यांत फार मोठी संख्या हातउसन्या कर्जाची आहे. शेतकरी माहितीच्या शेतकऱ्यांस कर्ज देतांना व्याजाचा दर मोठा लावत असले तरी तारण मागत नाहींत असें याचें कारण असावें. प्रॉमिसरी नोटीचे तारणावर झालेल्या व्यवहारांची संख्या एकंदर व्यवहारांचे संख्येच्या ¼ हून थोडी जास्त आहे. तारणगहाण जमीन या वर्गांत त्याहून थोडे जास्त व्यवहार येतात. कबजेगहाण जमीनीचे व्यवहार यांचेहून फारच कमी (जवळजवळ निम्मे) दिसतात. तारणगहाण घर अगर ऐवज अगर कबजेगहाण जमीन यांवर अगदींच थोडे व्यवहार झालेले आहेत.

कर्ज काढण्याच्या कारणांचें वर्गीकरण पाहतां अनुत्पादक कारणांसाठीं काढलेलीं कर्जे व उत्पादक कारणांसाठीं काढलेलीं कर्जे यांच्या संख्या साधारण सारख्याच (एकूण व्यवहारांच्या शें. ४० इतक्या) असलेल्या दिसतात. अनुत्पादक कारणांत फार मोठा वांटा प्रापंचिक खर्चाचा असून लग्न इत्यादि धार्मिक कार्यांचा वांटा त्या मानानें बराच लहान आहे. उत्पादक खर्चांत जमिनीवरील खर्च, जनावरांसाठीं खर्च व इतर धंद्यासाठीं खर्च या कारणांची साधारण सारखीच संख्या आढळते. एकूण व्यवहारां-पैकीं ७ टक्के व्यवहार जुनें कर्ज फेडण्यासाठीं झालेले आहेत.

कर्ज काढलेल्या काळाचें वर्गीकरण करतांना युद्धकाळांतहि शेतकऱ्यांची स्थिति पुरेशी सुधारली नाहीं असें गेल्या दोन वर्षांत काढलेल्या कर्जाच्या मोठ्या संख्येवरून

दिसतें. एकंदर व्यवहारांशीं गेल्या दोन वर्षांत झालेल्या व्यवहारांचें प्रमाण हें पाटाखालील गांवांत कोरडवाहू गांवांपेक्षां जास्त असलेलें दिसतें. यावरून असेंहि एक अनुमान काढतां येईल कीं गेल्या दोन वर्षांत शेतीधंद्यास तेजी चढल्यामुळें धंद्यांत घालण्यासाठीं हीं कर्जें काढलीं गेलीं असावींत. विशेषतः गुळाचे भाव चढल्यामुळें ऊंस लावण्यास बऱ्याच शेतकऱ्यांनीं सुरवात केली. त्यासाठीं हीं कर्जें काढलीं जाणें शक्य आहे.

आजचें एकूण देणें पाटाखालील गांवांत सरासरी दर कुटुंबास ४०१·१ इतकें असून प्रत्येक व्यवहार सरासरी रु. २६५·४ चा आहे. कोरडवाहू गांवांत हें प्रमाण बरेंच कमी — दर कुटुंबास सरासरी रु. २९२·८ व दर व्यवहार रु. १९५·४ चा — पडतें. पाटाखालील गांवांतील जमीन हें जास्त चांगलें तारण समजलें जात असल्यानें व तेथील शेतीधंदा हा जास्त भांडवली असल्यानें असें होणें साहजिक आहे.

निम्म्याहून जास्त व्यवहारांत, कर्जांत व आतांचे देण्यांत फरक नाहीं; व त्यांतील मोठा वांटा व्याज वेळचे वेळीं गेलेल्या कर्जांचा आहे. कमी झालेल्या कर्जांची संख्या फारच कमी आहे. एक तृतीयांशाहून जास्त व्यवहारांत कर्ज वाढलें असून गेल्या दोन वर्षांचें व्याज थकलेल्यांची संख्या बरीच मोठी आहे. यावरूनहि युद्धकाळांत शेतकऱ्यांची स्थिति फारशी सुधारली नसावी असें दिसतें.

कोष्टकाचे दुसऱ्या भागांत हीच सर्व माहिती वेगवेगळ्या सावकारांचे प्रकारावर दिली आहे. सर्वांत जास्त (निम्म्याहून अधिक) व्यवहार शेतकरी–सावकारांनीं केलेले आढळतात. अर्थातच शेतकऱ्यांनीं गांवांतले गांवांत जास्त कर्जें दिलेलीं आढळतात. १०० ते १५० रुपये मुद्दलाचीं कर्जें शेतकरी–सावकारांनीं सर्वांत जास्त दिलेलीं आहेत. यांनीं केलेल्या व्यवहाराचा बराच मोठा भाग रु. २०० चे आंतील व्यवहारांचा आढळतो. एक पैसा दर (द. सा. द. शें. रु. १८।।।) हा यांच्यांत जास्त प्रचलित असलेला आढळतो. हातउसनीं दिलेलीं कर्जें यांचे व्यवहारांत बरींच (शें. ४४) आढळून येतात. तारणामध्यें प्रमुख प्रकार प्रॉमिसरीनोट, कबजेगहाण जमीन व तारणगहाण जमीन हे याच अनुक्रमानें आढळून येतात. विशेषतः कबजेगहाण जमिनीचे तारणावर झालेल्या व्यवहारांपैकीं बराचसा व्यवहार याच वर्गानें केलेला दिसतो याचें कारण उघडच आहे.

राहिलेल्या वर्गांचा क्रम व्यापारी, सोसायटी, सावकार व धनगर असा लागतो. खेडेगांवांत व्यापार करणाऱ्यांचा एक प्रमुख पोटधंदा सावकारी हाच असतो हें लक्षांत घेतल्यास त्यांच्या जास्त संख्येचें कारण सहजच लक्षांत येईल. पाहणीच्या गांवांपैकीं मुंजवडी हें गांव सोडून सर्व गांवीं सोसायटी असूनहि सर्व व्यवहारांच्या फक्त शें. ८ इतके व्यवहारच सोसायटीचे आहेत त्याचें कारण सोसायटीचे तारणाबाबतचे व कर्ज वापरण्याबाबतचे कडक नियम हें असावें. सोसायटीच्या व्याजाचा दर शेतकरी व व्यापारी

सावकारांहून बराच कमी आहे. पण इतर वर्गातील सावकार हातउसन्या कर्जापासून वेगवेगळ्या सर्व प्रकारच्या तारणावर कर्ज देतांना दिसतो. सोसायटीचे सर्व व्यवहार तारणगहाणावर चालतात. त्यामुळें दुसऱ्या सावकारांकडून कर्ज काढणें शेतकऱ्यांस जास्त परवडतें असें दिसतें.

वेगवेगळ्या वर्गांनीं दिलेल्या कर्जाकडे पाहतां सोसायटीनें केलेल्या व्यवहारांचा बराच भाग रु. १०० ते ३०० या मुद्दलाच्या कर्जाचा असलेला दिसतो. सावकारी ज्यांचा धंदा नोंदला गेला आहे अशांनीं दिलेलीं कर्जे '४९ व आंत' या वर्गापासून ते '३०० ते ४००' या वर्गापर्यंत साधारण सारखीं वांटलेलीं दिसतात. व्यापाऱ्यांनीं दिलेल्या कर्जाचा बराचसा भाग ३०० रु. पर्यंतच्या कर्जाचा दिसतो.

सोसायटीचे व्याजाचे दर ९॥ व १२॥ असे आहेत. सावकारांचे व्यवहार ११ ते १५ या दरांत सर्वांत जास्त आहेत. व्यापाऱ्यांचे व्यवहार १६ ते २० या दरांत जास्त आहेत.

तारणाचे बाबतींत व्याज नसलेले खात्यावरील व्यवहार अर्थातच व्यापाऱ्यांत जास्त सांपडतात. बाकीच्या बाबतींत वेगवेगळ्या वर्गांत फारसा फरक दिसून येत नाहीं. कोणत्या कारणासाठीं कर्ज दिलें हें बघतां सोसायटीनें दिलेल्या कर्जाचा सर्वांत मोठा भाग जमीन घेणें व उत्पादक कारणांत आढळतो तर इतर सर्वांनीं दिलेल्या कर्जापैकीं बऱ्याच कर्जाचें कारण प्रापंचिक खर्च हें असल्याचें दिसतें.

कर्जाचा काळ पाहतां सोसायटीनें गेल्या दोन वर्षांत फारच थोडीं कर्जे दिलेलीं आढळतात. त्याचे आधीं मात्र सोसायटीचीं कर्जे नियमित घेतलीं गेलीं असल्याचें दिसतें. तेव्हां सोसायटीचे व्यवहारांत जुन्या कर्जाचें प्रमाण बरेंच जास्त आहे. अशा लांब मुदतीच्या जुन्या कर्जाचें प्रमाण इतर सावकारांच्या व्यवहारांत बरेंच कमी आहे. सावकारांच्या वेगवेगळ्या वर्गाचें एकंदर कर्जव्यवहारांतील स्थान खालील शेंकडेवारीवरून लक्षांत येईल.

| वर्ग | शें. व्यवहारसंख्या | शें. देणें |
|---|---|---|
| सोसायटी | ८ | १३ |
| सावकार | ५ | ६ |
| व्यापारी | १४ | १६ |
| शेतकरी | ५३ | ४७ |
| धनगर | ४ | ३ |
| इतर | १३ | १२ |

कोष्टक नं. ९ मध्यें शेतकऱ्यांनीं कसलेल्या शेतजमिनीच्या आकाराप्रमाणें त्यांचे गट पाडून त्या गटांची माहिती दिलेली आहे. शेतजमिनीचा आकार लक्षांत घेतांना येथें

वेगवेगळ्या प्रकारच्या सर्व जमिनीचें जिराईत जमिनींत पुढील प्रमाणांत रूपान्तर केलें आहेः– १ एकर पाटाखालीं भिजणारी जमीन = ४ एकर जिराईत जमीन; १ एकर विहिरीखालीं भिजणारी जमीन = २ एकर जिराईत जमीन. जमिनीचे आकारांत फक्त कसलेल्या जमिनीचा अंतर्भाव केलेला आहे. अशा तऱ्हेनें सर्व जमिनींचें जिराईत एकरांत मापन करून घेऊन मग कसणाऱ्या शेतकऱ्यांचे केलेल्या जमिनीच्या आकारावर आठ गट पाडले आहेत. याशिवाय शेतमजुरी हा मुख्य धंदा असणाऱ्यांचा एक व इतर धंदा करणाऱ्यांचा एक असे दोन गट पाडले आहेत.

वेगवेगळ्या गटांत असणाऱ्या कुटुंबांचें प्रमाण पहातां (२० ते २५ एकरांचा) ओ गट सोडून बाकी सर्व शेतकरी गटांत साधारण सारखी वांटणी झालेली दिसते. त्यांतले त्यांत ए (१० ते १५ एकर) गटांत जास्त संख्या असलेली दिसते. पाटाखालील गांवें व कोरडवाहू गांवें यांच्या वेगवेगळ्या आंकड्यांकडे पाहतां अ गटापासून औ गटापर्यंत पाटाखालील गांवांत चढता क्रम व कोरडवाहू गांवांत उतरता क्रम साधारणपणें आढळून येतो. पाटाखालीं भिजणाऱ्या जमिनीची ४ जिराईत एकरांशीं मापनांत बरोबरी केली असल्यामुळें असें होणें साहजिक आहे. केवळ शेतमजुरी करणाऱ्या गटांचें प्रमाण दोन्ही प्रकारच्या गांवांत सारखेंच दिसतें तर इतर धंदा करणाऱ्यांचें प्रमाण कोरडवाहू गांवांत मोठें दिसतें.

केलेल्या जमिनींत लोकांच्या केलेल्या जमिनीचें प्रमाण फारच थोडें आहे हें वरील जमिनीबाबतच्या कोष्टकांत दिसलेंच आहे. लोकांची केलेली जमीन ही जास्त मोठ्या जमिनींच्या गटांत वाढत जातांना दिसते. बरीच जमीन असलेले शेतकरी स्वतः जमीन न कसतां कांहीं वेळां लोकांस करण्यास लावून देतात हें याचें कारण असावें.

कुटुंबांतील एकूण माणसांची संख्या औ शिवाय सर्व शेतकरी गटांत वाढत्या जमीनगटाबरोबर फारच थोडी वाढलेली दिसते. विशेषतः पाटाखालील गांवांत ही वाढ अतिशयच थोडी आहे. इतर गांवांत हें प्रमाण त्या मानानें जास्त वाढतांना दिसतें. औ गटांत ही वाढ एकदम बरीच दिसून येते. मोठ्या जमिनी या संयुक्त कुटुंब असल्यामुळें तशा राहणें हें याचें एक कारण असूं शकेल. केवळ शेतमजुरी व इतर धंदा करणाऱ्यांत सरासरी कुटुंबांतील माणसांची संख्या शेतकऱ्यांपेक्षां कमी असलेली दिसते.

न मिळवत्या माणसांची संख्या वाढत्या जमिनीच्या गटांबरोबर थोड्या प्रमाणांत पण वाढतांना दिसते. मिळवत्या माणसांत शेती व शेतमजुरी करणाऱ्यांचें प्रमाण तसेंच वाढत जातांना दिसतें. शेतीबरोबर इतर धंदा करणाऱ्यांचें व केवळ शेतमजुरी करणाऱ्यांचें प्रमाण मात्र अर्थातच वाढत्या जमीनगटाबरोबर कमी होत जातें. केवळ शेतमजुरी करणाऱ्यांची व केवळ इतर काम करणाऱ्यांची संख्या शेतकरी गटांत फारच कमी आढळते.

उत्पन्नाचे आंकडे फक्त रोख मिळालेल्या उत्पन्नाचे आहेत. बलुत्याच्या उत्पन्नाची मात्र किंमत करून लिहिलेली आहे. घरीं ठेवलेल्या शेतमालाचें व जनावरांपासून मिळालेल्या पदार्थाचें फार मोठें उत्पन्न यांतून वगळलें गेलें आहे हें लक्षांत ठेवून या आंकड्यांकडे बघितलें पाहिजे. मजुरीपासून मिळणारें उत्पन्न हें शेतमजुरी हा मुख्य धंदा असणाऱ्यांमध्यें सर्वात जास्त (पाटाखालीं १४८·४; कोरडवाहू १११·२) असून वाढत्या जमिनीच्या गटांमध्यें तें कमी कमी होत गेलें आहे व औ गटांत तें फारच कमी आहे. गाडीभाडें करून फारसें उत्पन्न कोठेंच आलेलें दिसत नाहीं. बलुतेदार हे इतर धंदा प्रामुख्यानें करणाऱ्यांच्या गटांत बरेच आले असून त्या गटांत बलुत्याचें सरासरी उत्पन्न पाटाखालीं १०·६ व इतर भागांत १२·३ पडतें. इतर उत्पन्न या सदराखालीं, परगांवाहून येणारे पैसे, येणारें व्याज, खंड, पेन्शन, इतर धंद्याच्या विक्रीचें उत्पन्न वगैरे संकीर्ण बाबी येतात. अशा वेगवेगळ्या बाबी यांत एकत्र आल्यानें याचे रकमांत सारखेपणा असा विशेष दिसून येत नाहीं. कोरडवाहू भागांतील केवळ इतर काम करणाऱ्या गटाचें यांतील सरासरी उत्पन्न बरेंच जास्त (११३·७ रु.) आहे याचें कारण घोंगड्या विणण्याचा धंदा त्या भागांत बराच चालतो हें असावें.

जनावरांपासून येणारें रोख उत्पन्न वाढत्या जमीनगटांप्रमाणें फारसें बदलतांना दिसत नाहीं. साधारणपणें बऱ्याच गटांत दिसून येणारी गोष्ट म्हणजे इतर गांवांतील हें उत्पन्न पाटाखालील गांवांपेक्षां जास्त आहे. बाकी वेगवेगळ्या गटांत पडणाऱ्या उत्पन्नांतील तफावतीचा विशेष मेळ घालतां येत नाहीं.

शेतमालाच्या विक्रीपासून येणाऱ्या उत्पन्नांत वाढत्या जमिनीच्या गटाबरोबर सारखी वाढ दिसून येते. १० एकरांचे खालील गटांत ही विक्री कोरडवाहू भागांत जास्त दिसून येते तर वरील गटांत पाटाखालील भागांत ती जास्त दिसते. क १ व क २ गटांत या बाबीखालीं येणारी विक्री ही खंड अगर वांटा म्हणून आलेल्या धान्याची होय.

एकूण रोख उत्पन्नाचे आंकड्यांकडे पाहतां अगदीं खालच्या गटांत व अगदीं वरच्या गटांत तें जास्त व मधल्या गटांत कमी असलेलें दिसून येतें. क १ व क २ या गटांचीं रोख उत्पन्नें ओ गटाहूनसुद्धां जास्त असलेलीं आढळतात. पण यांत असें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं क १ व क २ या गटांस घरचें धान्यादि उत्पन्न जवळजवळ मुळींच नाहीं. तेव्हां हें रोख उत्पन्न हाच त्यांच्या उत्पन्नाचा मोठा भाग आहे. उलट ओ, औ या गटांच्या एकूण उत्पन्नाचा रोख उत्पन्न हा कमी महत्त्वाचा भाग आहे. घरीं ठेवलेलें त्यांचें धान्य, जनावरांपासूनचें उत्पन्न हें यांत धरलें जात नाहीं. हेंच कारण अ गटाचें रोख उत्पन्न त्याचेहून जास्त जमिनीच्या गटाच्या रोख उत्पन्नापेक्षां जास्त दिसतें त्याचें असावें. औ गट सोडून इतर प्रत्येक गटांत त्यांतील पाटाखालील कुटुंबाच्या सरासरी रोख उत्पन्नापेक्षां इतर भागांतील कुटुंबाचें सरासरी रोख उत्पन्न कमी आहे. औ गटांत मात्र इतर भागांतील सरासरी उत्पन्न हें

पाटाखालील भागापेक्षां जास्त भरतें. हा फरक मुख्यतः 'इतर' उत्पन्नांत पडतो. याचीं कारणें घोंगडीचा धंदा करणारे बरेच धनगर लोक मोठ्या जमिनीचे मालक आहेत व रेल्वे जवळ असल्यामुळें व जमिनीची उत्पादकता कमी असल्यामुळें बाहेरगांवीं (पुणें, मुंबई, सुरत, या बाजूस) कामास जाऊन घरीं पैसे पाठविणारे लोक या भागांत बरेच आढळतात हीं असूं शकतील.'

या कोष्टकांत फक्त बैल, गाई, रेडे, म्हशी, खोंड, कालवडी, रेडे, व रेडया या जनावरांचा समावेश केला आहे. कामाच्या बैलांचें व इतर जनावरांचें प्रमाण अपेक्षेप्रमाणेंच वाढत्या जमिनीच्या गटांबरोबर वाढत जातें. म्हशींचे बाबतींत कोष्टकांत असा कांहींच नियमितपणा दिसत नाहीं; मात्र सर्व गटांत कोरडवाहू भागांत म्हशींचें प्रमाण जास्त दिसून येतें, याबद्दल वरील एका कोष्टकांत चर्चा केलीच आहे.

कर्जाच्या रकमा एकूण आज असलेल्या देण्याच्या दाखविल्या आहेत. ज्या प्रमाणांत शेती जास्त भांडवली व जमिनीचें तारण मोठें त्या प्रमाणांत कर्जहि मोठें असें साधारणपणें दिसून येतें. औ गटांत सर्वात जास्त सरासरी कर्ज आहे. इतर गटांत दर वेळीं कमी जमिनीच्या गटांबरोबर कर्ज कमी होत गेल्याचें दिसत नाहीं; पण साधारणपणें तशी प्रवृत्ति दिसून येते. क १ गटांत क २ गटापेक्षां कर्ज कमी आहे याचें कारण शेतमजुरांना कांहीं मोठें तारण नसल्यानें त्यांस कर्ज मिळणें कठीण असतें; उलट इतर धंदा करणारांस भांडवलाची जरूर असते व उत्पन्नाचीं साधनें (उदा. घोंगड्यांचे माग) व उत्पादित माल हें मोठें तारण त्यांस ठेवतां येतें हें असावें.

## परिशिष्ट ए

# बांधावयाच्या सार्वजनिक इमारती

### पहिलीं पांच वर्षे

(१) अधिकारी व सरकारी नोकरांसाठीं घरें (कर्ज काढून)

(२) मुलींची शाळा

(३) पोलिस क्वार्टर्स

(४) कपाशी व गूळ बाजार (कर्ज काढून)

(५) पी. डब्ल्यू. डी. स्टोअर

(६) फिरतीस उपयोगी बंगले व चावड्या—साखरवाडी, फलटण, कारडगांव, आदरकी, तरडगांव, निंबळक, व बरड येथें.

(७) साप्ताहिक बाजारासाठीं जागा (कर्ज काढून)

(८) सार्वजनिक संडास व स्नानगृहें (फलटण शहर)

(९)*शेतकी, औद्योगिक व प्राथमिक शाळांस इमारती
(१०)*फलटण येथील रुग्णालय व अनुषंगिक इमारती
(११)*आदरकी, साखरवाडी, तरडगांव, निंबळक व बरड येथें दवाखाने व अनुषंगिक इमारती.

पुढील वर्षे

(१) हायस्कूलसाठीं जादा इमारत
(२) कचेऱ्यांसाठीं जादा इमारत
(३) स्त्रियांसाठीं क्लब
(४) क्लब हद्दींतील बंदिस्त बॅडमिंटन कोर्ट
(५) ग्रंथालयासाठीं इमारत
(६) सार्वजनिक नाट्यगृह (कर्ज काढून)
(७) गुदामें
(८) हायस्कूलसाठीं पॅव्हिलियन.

## परिशिष्ट ऐ

## समितीचे कामासाठीं झालेला खर्च

| बाब | रक्कम | | |
|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै |
| १ सभासदांचा प्रवासखर्च, प्रवासभत्ता वगैरे | ५४१ | १२ | ९ |
| २ नोकरवर्गाचा पगार वगैरे ... | १,५०६ | ११ | ६ |
| ३ नोकरवर्गाचा प्रवासखर्च, प्रवासभत्ता वगैरे | ३०८ | ५ | ६ |
| ४ स्टेशनरी, पुस्तकें, पोस्टेज ... | २२९ | ११ | ६ |
| ५ इतर ... ... ... | ५७ | २ | ६ |
| एकूण ... | २,६४३ | ११ | ९ |

ह. कृ. परांजपे
चिटणीस

ध. रा. गाडगीळ
अध्यक्ष

* यांचा खर्च शिक्षणाच्या व वैद्यकीय मदतीच्या योजनांत धरलेला आहे.

# परिशिष्टें

## परिशिष्ट ओ

## समितीपुढें साक्षी देणाऱ्या नागरिकांचीं नांवें

(१) श्री. विनायक भिकाजी देशपांडे

(२) श्री. श्रीपाद माधव दाणी

(३) श्री. मोतीराम नथुराम दोशी

(४) श्री. बाजीराव आनंदराव पवार, अध्यक्ष, फलटण नगरपालिका

(५) श्री. विश्वंभर शंकर झिरपे, अध्यक्ष, फलटण लोकलबोर्ड.